(१)

# काहीच सुचत नाही.

एखादा दिवस असाच उगवतो. खूप कंटाळवाणा खूप कामं करायची असतात. बाहेरही जायचं असतं. काय करू काय नको असं होतं विचारातच वेळ जातो दिवस संपतो पण काहीच सुचत नाही आणि दिवस वाया गेल्याची खंत वाटते.

आज माझं तसंच झालं आहे. आता संध्याकाळी कट्ट्यावर जायचं आहे. म्हणजे आजचा दिवस संपला. पण आमचा ग्रीन कट्टा आहे. आजकाल फॅशन आहे ना! ज्याला त्याला ग्रीन म्हणायची. तर तो कांही बागेतला किंवा उद्यानातला कट्टा नाही. असाच एक बाक आहे त्याचं नामाभिधान आम्हीच सगळ्यांनी ग्रीन कट्टा केलं.

रोज संध्याकाळी आम्ही सर्वजणी तिथे जमतो. मग गप्पांना काय तोटा! विषय काय म्हणाल तर एकका! विषय असतो. कुणी प्रवासातल्या गमती जमती सांगतं. कधीतरी स्वयंपाक करतानाचे अनुभव, साड्या, दागिने हे तर बायकांचे आवडते विषय. कधीतरी तोंडी लावायला राजकारण. आजची पिढी जुनी पिढी यातील तफावत. शिवाय आज वडापाव, पिझ्झा, पावभाजी यासारखे पदार्थ त्यांच्या सारखेच आपले पारंपरिक पदार्थ. अर्थात आमच्या ग्रीन कट्ट्यावरच्या आम्ही भगिनी सर्वच पदार्थांना न्याय देतो. चवीनं सगळ्यांचा आस्वाद घेतो.

कधी कधी या कट्ट्यावर आम्ही छोट्या छोट्या पार्ट्या पण करतो. हल्ली सगळ्यांचे वाढदिवस घरोघरी साजरे होतात पण मैत्रिणी बरोबर कांही वेगळीच मजा असते ना!

आमच्या ग्रुपमधे साधारण ७०-८०-८५ वयाचे सदस्य आहेत. पण कोणालाही कंटाळा म्हणून नाही. सगळ्याच उत्साही. एखादी सहलही आम्ही Enjoy करतो. आमची एक मैत्रिण नागपूरला असते पण पुण्यात आली की ती आमच्यात असते ती म्हणाली [redacted] आ! या वयात तुम्ही इतक्या उत्साही कशा ती एकदोन

Page No.: YOUVA
Date:

वाक्य बोलली. मग आम्ही सर्वांनी तिला करण्यावर कविता लिही म्हटल आणि तिने ती लिहिली. ती मी पुढे देणारच आहे.

एकंदरीत काय आम्ही खिसाची सांगता अशी आनंदातच करतो. सकाळ संध्याकाळ फिरायला जायचं अर्थात अंधार पडायच्या आत कारण अंधारात दिसलं नाही. कोणी धडपडलं असं नको नाहीतर ज्येष्ठांना लोकांची मुक्ताफळं ऐकावी लागतात. "ही ज्येष्ठ मंडळी चुपचाप घरात का बसत नाहीत उगाच रस्त्यात मधेमधे येतात." वगैरे वगैरे.

ज्येष्ठ नागरिक तरी काय करणार घरोघरी ते एकटेच पडतात. कारण मुलं सुना नातवंड सर्व आपापल्या कामात व्यस्त असतात. त्यांच्या साठी जीवन पार धावपळीच झाले आहे. आम्ही मात्र निरुद्योगी झालो आहोत.

असा आमचा हिरवा कंच कट्टा आहे. कसंही आयुष्याची संध्याकाळ आनंदात घालवतो.

कांहीच सुचत नाही म्हणताना कांहीतरी खरडतच बसले वाचून बघा कसं वाटतय.



आशा पावगी
"आनंदवन", B-10
वृंदावन कॉम्प्लेक्स
कोथरूड.